# जाहीरात

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नागपुर जिल्हा स्तरावर कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर **(ऑन कॉल तत्वावर)** विशेषतज्ज्ञांचे पॅनल तयार करण्याकरिता खालील प्रमाणे जाहीरात देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | आवश्यक विशेषतज्ज्ञांची संख्या | सेवा दयावयाच्या आरोग्य संस्थेचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | स्त्रीरोग तज्ञ | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र या विषयातील पदवी/पदवीका | एकुण पदे-२६ | उपजिल्हा रुग्णालये कामठी व रामटेक,ग्रामीण रुग्णालय काटोल,कळमेश्वर,उमरेड,कुही,पारशिवनी, भिवापुर,हिंगणा,नरखेड,मौदा,पाटणसावंगी व देवलापार (सर्व स्पेशिलिटीचे प्रत्येकी २ विशेषतज्ज्ञ भरण्यात येतील.) |
| २. | बालरोग तज्ञ | बालरोग या विषयातील पदवी/पदवीका | एकुण पदे-२६ | |
| ३. | भुलतज्ञ | भुलशास्त्र या विषयातील पदवी/पदवीका | एकुण पदे-२६ | |
| ४. | सर्जन | शल्य चिकित्सक या विषयातील पदवी | एकुण पदे-२६ | |
| ५. | फिजिशियन | भिषक या विषयातील पदवी | एकुण पदे-२६ | |
| ६. | अस्थिरोग तज्ज्ञ | अस्थिरोग या विषयातील पदवी/पदविका | एकुण पदे-२६ | |
| ७ | क्ष-किरण तज्ज्ञ | एम.डी रेडिओलॉजी/डीएमआरडी | एकुण पदे-१२ | उपजिल्हा रुग्णालये कामठी-२,रामटेक-२,ग्रामीण रुग्णालय काटोल-२,कळमेश्वर-२,उमरेड-२ व कुही-२ |

उपरोक्त विशेषतज्ज्ञांचे जिल्हास्तरावर पॅनल तयार करुन उपरोक्त रुग्णालयांत ओ.पी.डी.,प्रसुती, सिझेरीयन प्रसुती व इतर मेजर/मायनर शस्त्रक्रिया सेवा उपलब्ध करुन देण्याकरिता जाहीरातीत नमुद केलेल्या रुग्णालयाच्या ठिकाणी भरावयाची आहेत.सर्व इच्छुक उमेदवारांनी त्यांचा अर्ज खालील दर्शविलेल्या तक्त्यात नमुद दिनांकाच्या दिवसी मुळ कागदपत्रासह जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय,नागपुर यांच्या कार्यालयात सादर करावे.

| अ.क्र. | कंत्राटी पदे भरती वेळापत्रक | दिनांक |
|---|---|---|
| १ | अर्ज स्विकारण्याचा दिनांक व वेळ | 24/06/2026 |
| २ | अर्जाच्या छाननी अंती पात्र/अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिंनांक वे वेळ | |
| ३ | मुलाखतीचा दिनांक व वेळ | |

# अटी व शर्ती -

सविस्तर जाहिरात अटी, शर्ती तथा अर्जासह **www.nagpurzp.com** वर उपलब्ध आहे.

**आवश्यक कागदपत्रे :-** खालील कागपत्रांची मुळ प्रतीची छायांकिंत प्रत स्वसाक्षांकित करुन अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

१) पदवी /पदविका प्रमाणपत्रे २) गुणपत्रिका (सर्व) ३) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे ४) शाळा सोडल्याचा दाखला/जन्म तारखेचा दाखला ५) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्र ६) स्पेशालिस्ट पदाकरीता रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट ७) पासपोर्ट आकाराचा फोटो ८) क्र. १ ते ०७ पर्यतचे सर्व दस्तऐवज क्रमवारी जोडावेत.

**अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक** :- दि. ३|07|26 सायंकाळी ५.०० पर्यत (सुट्टी चे दिवस वगळुन)
**अर्ज स्विकारण्याचे ठिकाण** :- जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा रुग्णालय,मानकापुर,नागपूर
**नोंदणी/मुलाखत स्थळ** :- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नागपूर

**टिप** - वरीलपैकी पदांकरीता पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रत्येक महिन्याच्या पहिल्या मंगळवारी प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येईल. जर सदर दिवशी शासकिय सुट्टी असल्यास दुसऱ्या दिवशी प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येईल.

## अटी व शर्ती

१)वरील सर्व पदे **ऑन कॉल स्वरुपाची** असुन त्यांचा कालावधी दि. ................ पर्यत राहील. हा कालावधी वाढविला जाण्याची शक्यता आहे परंतू सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही.

२)सदर पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून ऑन कॉल स्वरुपाची पदे आहेत. म्हणून अर्जदाराला शासकिय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३)अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा,अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४)जिल्हा/परिमंडळ स्तरावरुन नियुक्त करण्यात येणाऱ्या व त्यांचे नियुक्ती/पुनर्नियुक्ती अधिकार जिल्हा/परिमंडळस्तरावर देण्यात आलेले आहेत. अशा ऑन कॉल विशेषतज्ज्ञांचे कामकाज असमाधानकारक असल्यास कारणे दाखवा नाटीस/ज्ञापण बजावण्यात येईल. संबंधितांनी विहित मुदतीत खुलासा सादर केल्या नंतर खुलासा असमाधानकारक असल्यास नैसर्गिक न्याय तत्वानुसार स्वतःचे बाजू मांडण्याची संधी देण्यात येईल. तद्नंतर असमाधानकारक कामकाजाबाबत खात्री केल्यानंतरच सेवा समाप्तीचे आदेश काढण्यात येईल. सेवा समाप्ती आदेशात त्यांच्या वर लावण्यात आलेल्या दोषारोपाचे व ते दोषारोप सिध्द होत असल्याचा सविस्तर उल्लेख करण्यात येईल.

५)उपरोक्त सर्व पदासाठीचे मानधन जाहिरातीत नमुद केल्यानुसार देय राहिल.

६)स्थानिक,शासकीय अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकांस प्राधान्य दिले जाईल.

७)उपरोक्त पदाकरीता निवड प्रक्रिया ही राज्यस्तरावरुन प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार घेण्यात येत असल्यामुळे जाहीरातीमधील नमूद दिनांकास विहीत कालावधीत सोबत दिलेल्या अर्ज नमुन्यात मुळ शैक्षणिक कागदपत्राच्या सत्यप्रतीसह या कार्यालयात अर्ज सादर करावा, त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत.

८)संबंधित पदाकरीता नोंदणी नंतर पात्र, अपात्र यादी प्रसिध्द दिनांकास कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यासंबंधी आक्षेप असल्यास वरील नमूद प्रमाणे कार्यालयीन वेळेत घेवून निराकरण केले जाईल त्यानंतर प्राप्त आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

९)उपरोक्त संबंधीत पदाकरीता तत्सम कॉन्सीलकडून रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे.अन्यथा उमेदवारांस अपात्र ठरवल्या जाईल.

१०)पदभरती प्रक्रियेस कार्यालयात उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

११)जाहीरातीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या "विशेषतज्ज्ञ" या पदाकरिता थेट मुलाखती घेऊन त्यांची नियुक्ती करण्याकरिता खालील गुणाकंन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

1) Subject Knowledge (10)
2) Research &Academic Knowedge(10)
3) Leadership Quality (10)
4) Administrative Abilities
5) Experience (10)
6) For Govt.Experience-2 Marks for one year
7) For Private Experience-1 Marks for one year
Total experience-10 marks Maximum **Total Marks-50**

१२) शासकिय सेवानिवृत्त अधिकारी यांचेकरीता वयोमर्यादा ७० वर्ष असेल तसेच अनुभवास प्राधान्य असेल.

१३) सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा कोणत्याही प्रकारे फौजदारी प्रकरण नसावे.

१४) संपूर्ण निवडप्रकिया ही गुणवत्तेवर आधारीत पारदर्शी पध्दतीने घेण्यात येईल.

भरती प्रक्रिया स्थगिती देणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष, निवड समिती, रा.आ.अ. नागपूर यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

स्वा
**जिल्हा शल्य चिकित्सक**
**जिल्हा रुग्णालय,**
**नागपुर**

स्वा
**सदस्य सचिव**
**जि.ए.आ.व कु.क.सो.**
**तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद, नागपूर**

स्वा
**अध्यक्ष**
**जि.ए.आ.व कु.क.सो.**
**तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,नागपूर**